रयत शिक्षण संस्थेचे,

# दहिवडी कॉलेज दहिवडी

## वाचन पंधरवाडा दि.१ ते १५ जानेवारी २०२५

## महाराष्ट्र शासन उच्च व तंत्र शिक्षण विभाग, शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर व महाविद्यालयातील ग्रंथालय विभाग, वाड्मय मंडळ, राष्ट्रीय सेवा योजना

आयोजित

## ‘वाचन संकल्प महाराष्ट्राचा ’

दि. ६ /०१/२०२५

## लेखक व विद्यार्थी वाचक संवाद

दहिवडी कॉलेज येथे महाविद्यालयातील ग्रंथालय विभाग वाङ्मय मंडळ, मराठी विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने व वाचन पंधरावडा निमित्ताने आयोजीत स्थानिक लेखक परिसंवादात संपन्न झाला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी उपप्राचार्य डॉ. एस. एम. खेत्रे होते. या कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे म्हणून माण तालुक्यातील ख्यातनाम लेखक मा.नागु विरकर हे उपस्थित होते. त्यांनी रानशाळा ही स्वरचित कथा सादर करुन कादंबरीचे कथा विद्यार्थ्यांच्या समोर उलगडून दाखविले .

या कार्यक्रमाच्या अध्यक्षीय मनोगतात महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ.संजय खेत्रे म्हणाले, "विद्यार्थ्यांनी लेखन, वाचन कौशल्य आत्मसात करून लेखनाची आवड निर्माण केली पाहिजे. विद्यार्थ्यांनी स्वतःच्या व्यक्तिमत्व विकासासाठी वाचन केले पाहिजे" कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा. डॉ. मीरा देठे यांनी केले.

सुत्रसंचालन प्रा.डॉ.अनुसया इमडे यांनी केले. आभार प्रदर्शन ग्रंथपाल प्रा. व्ही. एस. वाघेरे यांनी केले. यावेळी मराठी विभागप्रमुख डॉ. मीरा देठे, ग्रंथपाल प्रा. व्ही. एस. वाघेरे, प्रा. डॉ. अनुसया इमडे,प्रा. प्रवीण भोसले आदी प्राध्यापक व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

ग्रंथपाल
दहिवडी कॉलेज दहिवडी
ता. माण, जि. सातारा.

रयत शिक्षण संस्थेचे दहिवडी कॉलेज दहिवडी

प्र. प्राचार्य
दहिवडी कॉलेज, दहिवडी
ता. माण, जि. सातारा




प्रमुख पाहुणे म्हणून माण तालुक्यातील ख्यातनाम लेखक मा.नागु विरकर हे उपस्थित प्राध्यापक





